# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०९ मार्च २०१६

# गरवारे संस्थेत हवाई क्षेत्राचे प्रदर्शन

मुंबई – विद्यार्थ्यांना हवाईक्षेत्रातील करीअरबद्दल तसेच हवाईक्षेत्रातील विविध पैलुंची माहिती मिळावी यासाठी मुंबई विद्यापीठाच्या गरवारे इन्स्टीट्यूट ऑफ करीअर एज्युकेशन या संस्थेने आज विद्यानगरी परिसरात प्रदर्शनाचे आयोजन केले होते.एअरक्राफ्ट,कॉकपीट,रेस्क्यू ड्रोन,मॅग्नेस इफेक्ट,तसेच हवाई क्षेत्राशी निगडीत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती देण्यात आली. विद्यार्थी वर्गात हवाई क्षेत्राबद्दल जनजागृती आणि करीअरच्या दृष्टिकोनातून माहिती व्हावी त्याचबरोबर हवाई क्षेत्राला लागणा-या कुशल मणुष्यबळ यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठाची सलग्नित संस्था बॉम्बे फ्लाईंग क्लबच्या सहकार्याने हे प्रदर्शन भरविण्यात आले होते.या प्रदर्शनाचे उदघाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख म्हणाले की,भारत सरकारच्या स्कील इंडिया मिशनच्या पार्श्वभूमीवर नविन रोजगाराभिमुख आणि कौशल्याधारित अभ्यासक्रम राबविणारे आणि स्कील इंडिया मिशनला अलाईन होणारे मुंबई विद्यापीठ भारतातले पहिले विद्यापीठ असून या पार्श्वभूमीवर गेल्या ३४ वर्षापासून कौशल्यआधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणारी मुंबई विद्यापीठाच्या गरवारे करीअर एज्युकेशन संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून बीएस्सी एव्हीएशन आणि कमर्शियल पायलट कोर्स सुरु करण्यात येणार आहे. पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यवसायाभिमूख शिक्षणही आता विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार असल्याचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी सांगितले.झपाट्याने विकसीत होणा-या हवाई क्षेत्राला नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात कुशल मणुष्यबळ लागणार असून करीअरच्या उत्तम संधी या क्षेत्रात निर्माण होऊ पाहत असल्याचा आशावादही त्यांनी व्यक्त केला.या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला होता.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क / प्रकाशन / सांख्यिकी )